# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.०३/०६/२०२३

दुखापते :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | फ्रेजरपुरा अप क्र ३९५/२०२३ कलम २९४,३२४,३४ भादवि | छाबडा प्लॉट जिवन छाया कॉलनीमागे अमरावती | दि.०२/०६/२०२३ चे १८.३० वा<br><br>दा ता वेळ दि.०३/०६/२०२३ चे ००.१२ वा. | धम्मानंद भिमराव मेश्राम वय ५० वर्ष, रा. छाबडा प्लॉट, जिवन छाया कॉलनी मागे अमरावती | १.साहिल कैलास ससाने<br>२.लकी संतोष सरकटे दोन्ही रा. बेलपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी फि चा मुलगा हा घरासमोरील मुलांसोबत खेळत असताना बेलपुरा अमरावती येथील दोन मुलांनी येवुन शिवीगाळ करुन सिंगलबारवरुन खाली उतरुन बॅटने फि चे मुलाला मारहाण करीत होता म्हणुन फि चा मुलगा हा रडत घरी आला, फि ने त्यास काय झाले विचारल्यावर त्याने वरील हकीकत सांगितली तेवढयात मोहल्ल्यातील अनिल कातोड हे फि चे घरी आले म्हणाले की, तुमच्या मुलाला शिवीगाळ व बॅटने मारणा-या मुलाचे नाव साहिल कैलास ससाने व लकी संतोष सरकटे दोन्ही रा. बेलपुरा अमरावती असे आहे व ते तेथुन पळुन गेले आहे. अशा फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | गेलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती<br>अपक्र.७५८/२३ कलम-३२४,५०४,५०६ भादवी | अमरावती | गुघतावेळ दि.०२.०६.२३ चे २३.०० वा<br>दाखल तावेळ दि.०३.०६.२०२३ चे ०९.३३ वा | एक महिला | अशोक राहूल बोयत वय ५० वर्ष रा. लक्ष्मी नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी व तिची आई, भाउ असे घरासमोर बसले असता आरोपी हा दारु पिवून आला व फी स शिवीगाळ करीत होता तेव्हा फी च्या महिला नातेवाईकाने व भावाने आरोपीस समजविण्याचा प्रयत्न केला असता फीच्या भावाला आरोपीने लाथा बुक्यांनी मारहाण केली. फी ला लोटलाट केली असता फी. आरोपीस आवरण्यास गेली असता फीचे उजवे पायाला चावला त्यामुळे उजवे पायाचे टोंगळयाचे वर जखम होवून रक्त निघाले व तु कामावर जाताना तुला मारल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. अशा फीर्यादीचे रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | घटना नागपुरीगेट अप नं २६७/२०२३ कलम | ताज नगर नं २ अमरावती | घटना ता वेळ दि.०३/०६/२०२३ चे १२/३० वा दाखल ता वेळ दि.०३/०६/२०२३ चे | शेख आदील शेख कालु वय २८ वर्ष रा. गुलिस्ततानगर नं १ ह.मु | मोहम्मद नवाज मोहम्मद साबीर वय २० वर्ष रा.ताजनगर नं २ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की वर नमुद घटना का वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे मित्र यांच्या सोबत गोष्टी करीत अंसताना यातील नमुद आरोपी मोहम्मद नवाज मोहम्मद साबीर वय २० वर्ष रा.ताजनगर नं २ अमरावती हा त्या ठिकाणी येवून फिर्यादी ला खर्चासाठी पैसे मागितले पैसे न दिल्याच्या कारणा वरून आरोपीने फिर्यादीला डाव्या पायाच्या मांडीवर व पोटाची बरगडीवर चाकू मारून जख्मी केले त्या ठिकाणी शेख निसार शेख ईब्राहीम व |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३२४,५० ४,५०६ भा.दं.वी | | ०२/४२ वा | मुस्ताकभाई यांचे घरी भाड्याने अमरावती | | शुफियान खान हे आल्याने आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन धमकी देवून पळून गेला अशा फिर्यादीचे जिल्हा सामान्य रूग्णालय अमरावती वार्ड नं १६ येथील बयाणा वरून व डाँ सा यांचे मेडीकल सर्टीफिकेट वरून सदरचा गुन्हा दाखल |

विनयभंग :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ७ | १० |
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती<br>अपक्र.७५७/२३ कलम-३५४,३५४अ, ५०६ भादवी सहकलम (i)(ii) ॲट्रोसिटी ॲक्ट प्रमाणे (अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा अधि) | अमरावती | गुघतावेळ दि.०३.५.२३ चे संध्याकाळी १८.३० ते १९.०० वा<br>दाखल तावेळ दि.०३.०६.२०२३ चे ०१.३२वा | विजय पुंडलिकराव कविटकर वय.अं. ४५ वर्ष व्यवसाय नोकरी रा. चैतन्य कॉलनी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फि. व आरोपी एकाच कार्यालयात कार्यरत असुन आरोपी विजय पुंडलिक कवीटकर हे नेहमी फीर्यादीचे अंगाला स्पर्श करतात तसेच येता जाता धक्का देतात तसेच अश्लील भाषेत बोलून टॉनटींग करतो तसेच कोणत्याही प्रकारी प्रतिसाद दिला नाही तर प्रश्न करतात. फीर्यादी यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे वरीष्ठांना कसुरी रिपोर्ट पाठवून कार्यवाही करण्याची धमकी देतात दि. ०३.०५.२०२३ रोजी संध्याकाळी ०६.३० वा ते ०७.०० वा दरम्यान फी ही कॉयालयातून घरी जात असतांना अमरावती कोर्ट चे दुसरे गेट समोर आरोपी याने फीचा गाडीने पाठलाग करुन फी.ला शारीरिक सुखाची मागणी केली अशा फीचे जबानी रीर्पोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती<br>अपक्र.७५९/२३ कलम-३५४ ड ,५०६ भादवी सहकलम १२ | अमरावती | गुघतावेळ दि.०५.०६.२०२२ ते ०३.०६.२०२३ चे ०८.३० वा पावेतो<br>दाखल तावेळ दि.०३.०६.२०२३ | चेतन नंदकिशोर ख्लोकार वय २१ वर्ष रा. शिंगणापुर ता. दर्यापुर जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, आरोपी चेतन नंदकिशोर खलोकार याची ओळख फीर्यादी हीचे सोबत २०१७ पासून आहे सन २०२१ मध्ये फीर्यादी व आरोपी यांचे मोबाईल फोनवर बोललेवरुन मैत्रिचे रुपांतर प्रेमात झाले. याबाबत माहीती फी चे आईला माहीती झाल्याने तिचे आईने तिला समजून सांगितले यावरुन तिने आरोपीसोबत भेटणे बोलणे बंद केले. तेव्हापासून फीर्यादी हीचे मोबाईलवर आरोपी हा सारखा फोन करुन माझे तुझ्यावर प्रेम आहे मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही व त्याचेशी बोलण्यासाठी जबरदस्ती करायचा. फी चे ट्युशन संपल्यानंतर टयुशनचे बाहेर उभा राहून जबरदस्ती बोलायचा. तिने त्याला बरेचदा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पोक्सो | | चे १४.३७वा | | समजविण्याचा प्रयत्न केला दि. ०२.०६.२०२३ चे रात्री ०९.०० वा चे दरम्यान फोन करुन फीर्यादीला मला भेट असे म्हणून तिला भेटण्याकरीता बोलावले व त्याच वेळी फीर्यादी हीचे वडीलांचा वारंवार फोन आला असता तिचा फोन फलाईट मोडवर असल्यामुळे रीसीव्ह केला नाही ति परत आपले टयुशनमध्ये गेली असता तिचे वडीलांनी तिला खाली बोलावून तु कुठे गेली असे विचारले असता तेव्हा तिने घडलेली हकीकत तिचे वडीलांना सांगितले. आरोपी हा फीर्यादीला फोनवर सतत बोलण्यासाठी जबरदस्ती करतो बोलली नाहीतर मारण्याची धमकी देतो. अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

जबरी चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोठाणे बडनेरा अप क्र ४०८/२०२३ कलम २७९,३४१,३९२,३२३,४२७भादं वि | नेमानी गोडीवुन रेल्वे पुलाचे समोर बडनेरा ते अमरावती रोडवर | दि ०३/०६/२०२३ चे ०५.३०वा दरम्यान दाखल दि ०३/०६/२०२३ चे ९.५०वा | सुरेश उत्तम मोहीते वय ३९ वर्षे रा कांदळी ता दिग्रस जि यवतमाळ | शेख अकील शेख गफ्फुक वय ५० वर्षे रा यास्मीन नगर झोपडपट्टी पोस्टे नागपुरी गेट अमरावती ,अधिक दोन अनोळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि ट्रक चालक म्हणुन मंजुरीचे काम करतात ते दि ०२/०६/२०२३ रोजी रात्री ०८.३० वा दरम्यान मध्ये मालकाच्या सागन्यावरुन बच्चु सेठ मारवाडी दिग्रस याचा कापुस ट्रक मध्ये भरुन नेमानी जिन अमरावती येथे जाणयाकरीता निघालो रस्यात झोप येत असल्याने आराम केला बडनेरा दि ०३/०६/२०२३ चे सकाळी ०५.३० व ा नेमाऩी गोडावुन रेल्वेपुलाखाली उतरलो त्यावेळी रोडवर माझ्यामागुन एक प्रवासी आटो रिक्षा ने माझे ट्रकला ओवर टेक करुन रोडवर डीवायरडर ला घासला आटो मध्ये तिन इसम बसुन होते त्यानी अचानक माझे ट्रक समोर आटो उभा केला आटो मधुन तिन इसम उतरले त्यानी मला काही न बोलता माझ्या कँबिनमध्ये घुसुन मला मारहान केली. त्याच्या मारहानी मुळे मी बाहेर पळालो त्यावेळी त्यानी माझ्या गाडीत ठेवलेल्या बँग मधुन डीझल भरऩे करीता ठेवलेले नगदी ४००० रु. व निजी खर्चा साठी २३० रु व गाडीच्या डँशबोर्टवर ठेवलेला विवो कंपनिची मोबाईल अँन्ड्रॉईड मोबाईल कि अ ९००० रु असा एकुन १३,२३० रु घेवुन पळुन गेले. पळुन जाते वेळी माझ्या गाडीचा काच दगड मारुन फोडला व त्यानी माझ्या गाडीचे १२००० रु नुकसान केले पळुन जाते वेळी मी घटनेच्या वेळी आटोचा क्र पाहीला असता MH BW ३४३६ रंग काळा आहे माझी गाडी त्याच ठीकाऩी उभी करुन पोस्टे बडनेरा येथे आलो पोलीसाना घटनास्थळ दाखविले असता काही अतंरावर तो आटो उभा होता म्हणुन लगेच तेथे गेलो त्यातील इसमाने पोलीसाना पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला तो खाली पडल्याने त्याला डो्कयाला व डोळयाच्या जवळ मार लागल्याने त्या इसमाला पोलीसांनी ताब्यात घेतले आटोसह पोलीसस्टेशन ला आऩले त्या वेळी त्याचे नाव शेख अखिल शेख गफुर असे सागितले त्याच्या सोबतचे दोन इसम ज्याना मी चेहर्याने आळखु शकतो ते पळुन गेले त्याच्या विरुध्द कार्यवाही करन्या करीता रिपोर्ट देत आहे अशा फिच्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | नागपुरीगेट अप नं २६६/२०२३ कलम २०ब),२२( ब),२७(क ) एन.डी.पी.एस. अँक्ट | असोसियेशन उर्दु स्कुल चे बाजुची गल्ली पठाण चौक अमरावती | घटना ता वेळ दि.०२/०६/२०२३ चे २२/१५ वा दाखल ता वेळ दि.०३/०६/२०२३ चे ०१/००वा | सर् तर् स.पो.नि संदीप तोताराम हिवाळे वय ४२ वर्ष रा. पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | १) शेख अफजल शेख अजगर वय ३२ वर्ष रा.उसमान तेल वाले यांचे घराजवळ छाया नगर अमरावती<br>२) एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की वर नमुद घटना का वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो.स्टाँफसह पो.स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडून माहीती मिळाली की एक ईसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटाचा अंगात राखडी रंगाचे शर्ट व खाली निळ्या रंगाचा चेक्सचा पँन्ट व पायात चप्पल मो.सा कर्मांक **MH-27-AH-5884** हिरो हंक काळ्या रंगाची दुचाकी वाहनाने आपले जवळ अवैधरित्या गांजा माल बाळगुन बडनेरा कडून येणारे रोडने नागपुरीगेट असोसियेशन उर्दु स्कुल पठाण चौक अमरावती कडे येणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळताच माहीतीची नोंद घेउन व.पो.नि यांना माहीती देउन पो.काँ १७३२ हस्ते दोन प्रतिष्ठीत पंच बोलाउन पो.काँ १३०७ हस्ते प्रमाणित तराजु काटा बोलावून मा.स.पो.आ गाडगे नगर विभाग अमरावती शहर यांची लेखी परवानगी घेउन सोबत व.पो.नि पुडलिक मेश्राम सा तसेच जप्ती पंचनाम्यातील नमुद पंच व पो.स्टाँफ पो.हे.काँ १८८,२७७, पो.ना ४०,५७ पो.काँ ३५१ फोटोग्राफर पो.ना १०५२ तराजु मापारी यांचे सह लाख,गोदं,मेनबत्तती,सुई,धागा, कागद. कारबन,माचीस लँपटाप, फिनटर सह असोसियेशन उर्दु स्कुल चे बाजुची गल्ली पठाण चौक अमरावती गल्ली मध्ये ाे.स्टाँफ सह सापळा रचुन थाबलो काही वेळाने एक ईसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटाचा खबरे प्रमाणे वर्ण असलेला ईसम मो.सा कर्मांक **MH-27-AH-5884** ा हिरो हंक काळ्या रंगाची दुचाकी वाहनाने येताना दिसला त्यास थाबवून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव शेख अफजल शेख अजगर वय ३२ वर्ष रा.उसमान तेल वाले यांचे घराजवळ छाया नगर अमरावती असे सागितले त्यास अंगझडती व गाडीची झडती घेण्याचे कारण सागुन समजपत्र दिले असता त्याने अंगझडती व गाडीची झडती देण्यास सहमती दिल्याने त्याच्या गाडीची झडती घेतली असता त्याचे मो.सा चे रेकझीन च्या काळ्या रंगाच्या डिक्की मध्ये अनवर फँशन नावाचे प्लास्टीक चे पिशवी मध्ये पिवळ्या रंगाचे एक पँकीट ज्या मध्ये ओलसर गांजा माल ( आमली पदार्थ ) मिळून आल्याने ते पाकीट फोडून त्यातील गांजा एकत्रीत करून त्याचे वजन माप केले असता २ किलो गांजा माल ( आमली पदार्थ ) कि.अ २०,०००/- रू व मो.सा कर्मांक **MH-27-AH-5884** ा हिरो हंक काळ्या रंगाची दुचाकी कि.अ ३०,०००/- रू असा एकूण ५०,०००/- रूचा माल मिळून आल्याने पंचा समक्ष जप्त करून ताब्यात घेतला जप्त गांजा माला मधुन सि.ए सँम्पल करीता |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | २५ ग्रॅम वजनाच्या दोन वेगवेगळ्या पुड्या तयार करून त्याना खाकी कागदात गुडाळून सॅम्पल वर आमचे पंचाचे व आरोपीचे सहीचे कागदी लेबल लावून लाखेने पो.स्टे चे सिल केले व त्याना S-1,S-2 मार्क दिले तसेच पंचा समक्ष माला बाबत विचारपुस केली असता त्याने सागितले कि मी सदर माल बडनेरा येथील एक महिला हिचे कडून २०,०००/- रू मध्ये विकत घेतला असे सागितले सदर पंचनामा कार्यवाही करून पो.स्टेला आरोपी व मुद्देमाला सह परत आलो.आरोपीचे हे कुत्य कलम २०(ब),२२( ब),२७(क) एन.डी.पी.एस. अँक्ट प्रमाणे अपराध होत असल्याने फिर्यादी चे लेखी र्पिोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो. स्टे. राजापेठ अप क्र.५२९/ २०२३ कलम १२२ मपोका | देवरणकर नगर कविमंडळ हॉस्पीटल समोर अमरावती | दि.03/06/ 23 चे 01-00 वा.<br><br>दि.03/06/ 23 चे 02-01 वा . | सरतर्फे पोहेका सागर सरदार ब.नं. 158 पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर | निरंजन पंजाबराव कळसकर वय 30 वर्ष रा. भटवाडी गोपाल नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हा आपले अस्तित्व लपवित कोणतातरी हस्तक्षेपीय स्वरूपाचा गुन्हा करण्याचे इराद्याने मिळुन आला आहे. तसेच आरोपी हा सुर्यास्तानंतर व सुर्योद्यपुर्वी आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र स्वरूपाता गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने सदर आरोपी विरूध्द गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :–

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | बडनेरा मर्ग नं. ३६/२३ कलम १७४ जाफौ | सिंधी कँम्प नवि वस्ती बडनेरा | रवि पंजुमल कुंदवा वय ३७ वर्षे रा सिंधी कँम्प नवि वस्ती बडनेरा | पंजुमल कुदवा वय ७२वर्षे सिंधी कँम्प नवि वस्ती बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि यानी पोस्टे ला येवुन तक्रार दिली की ते पत्नी व मुला सह नमुद पत्यावर राहताता व मुलगा मृतक रवि पंजुमल कुंदवा वय ३७ वषे हा सिटीलँट बिझीलँन्ड येथे कपड्याच्या दुकानात काम करतो दि ०३/०६/२०२३ रोजी सकाळी ९.०० वा दरम्यान मुलगा रविने फिर्यादीला नोटबुक मागितल आणि फिर्याने रविला नोटबुक दिल आणि मंदीरात निघुन गेले आणि मुलगा रवि याने त्याच्या आईला स्वयपाक बनवायला सागितला व तो ९.३० वा दरम्यान त्याच्या बेडरुम मध्ये गेला आणि दार लावुन घेतला माझ्या शेजारी राहणारा नरेश आहुजा त्याला भेटायला आला त्याने त्याला आवाज दिला तर त्याने दार उघडला नाही फि घरी आले व त्यानी सुध्दा आवाज दिला तर रवी याने दार उघडलानाही त्याचा बेडरुमचा दरवाजा खोला तर माझा मुलगा रवि पंजुमल कुंदवा याने बेडरुम च्या स्लँप च्या लोखंडी हुक ला गुलाबी रंगाची ओढणी बांधुन फाशी लावुन आत्महत्या केली आत्महत्या का केली यांची चौकशी करीता रिपोर्ट देत आहे अशा फि च्या जबानि रि वरुन सदरचा मर्ग दाखल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | पोस्टे. नांदगाव पेठ मर्ग क्र. २४/२०२३ कलम १७४ जा.फौ. | राहते घरी मारवाडी पुरा नांदगाव पेठ<br><br>घ.ता. वेळ - दि. ०२/०६/२०२३ चे २०.३० वा. दरम्याण<br>दाखल ता. वेळ दि. ०३/०६/२०२३ चे १२.२१ वा. | एक महिला | सचिन ओमप्रकाश जोशी वय ४१ वर्ष धंदा मजुरी रा. मारवाडी पुरा नांदगाव पेठ | हकीकत अशाप्रकारे आहे की माझी महिला नातेवाईक हिचे मागील एक वर्षापासुन लग्णाचा विषय सुरु होता. तिला एक दोन मुले पाहुन गेले होते. दि. ०२/०६/२०२३ रोजी अंदाजे रात्री ०९.०० वा. दरम्याण कामाला असतांना कॉल आला व त्याने सांगीतला की माझे महिला नातेवाईक हिने फाशी घेतली तेव्हा मी तात्काळ घरी आलो. मी घरी आल्यावर पाहीले तर ती जमीनिवर पडलेली दिसली व घराचे टिनाला एक ओढणी बांधलेली दिसली आम्ही तात्काळ जवळ असलेले डॉ. मालपानी यांना बोलावले पँ त्यांनी किरण ची कुठलेही हालचाल होत नसल्याने व ती मृत झाल्याचे सांगीतले माझी महिला नातेवाईक हिने काल दि. ०२/०६/२०२३ रोजी अंदाजे ०८.३० वा. दरम्याण गळफास घेऊन आत्महत्या केली तिने आत्महत्या का केली याबाबत आम्हाला काहीही माहीत नाही. तसेच आमचा कुणावरही संशय नाही. आमची काहीही तक्रार नाही. अशा अर्जदार यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |
| ३. | पो.स्टे. राजापेठ मर्ग क्र. ५६/२०२३ कलम १७४ जा.फौ. | राहते घरी कुंभारवाडा जनता कॉलनी MIDC अमरावती<br><br>घ.ता.वेळ - दि. 03/06/2023 चे 07-00 वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. 03/06/2023 चे 10-59 वा. | एक महिला | गजानन नथ्थुजी गुजरे वय 46 वर्ष रा. कुंभारवाडा जनता कॉलनी MIDC अमरावती | आम्ही सपोउप नि केशव ब.नं. 883 पो.स्टे. राजापेठ अम. शहर आज रोजी पो.स्टे. ला 08-00 ते 14-00 वा. पावेतो डि.ओ.ड्युटी असतांना 09-00 वा. फिर्यादी नामे गजानन नथ्थुजी गुजरे वय 46 वर्ष रा. कुंभारवाडा जनता कॉलनी MIDC अमरावती यांनी पो.स्टे. ला येवुन फिर्याद दिली की, आज दि. 03/06/2023 रोजी सकाळी 07-00 वा. ते त्यांचे राहते घरी त्यांचे काम करत असतांना त्यांना अचानकपणे काहीतरी पडल्याचा आवाज आला. त्यांनी खाली जावुन पाहिले असता त्यांची महिला नातेवाईक हि घराच्या खालच्या मजल्यावरील पायरीवर पडली होती. त्यांनी व त्यांचे मुलाचे व मोहल्यातील लोकांचे मदतीने ऑटोने जिल्हा सामान्य रूग्नालय येथे इलाजाकरीता भर्ती केले असता मा. डॉ. नी तीला मृत घोषीत केल्याचे सांगीतले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल |